# कामशेत...

## एक काळरात्र



सागर पाटील

# कामशेत... एक काळरात्र

## सागर पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

कामशेत... एक काळरात्र

लेखक :   सागर पाटील

9158529817

patilsagarashok@gmail.com

www.facebook.com/sagrajput

सागर पाटील

फ्लैट-४,

दत्तराज अपार्टमेंट,

इंगळेनगर,आंबेडकर चौक

वारजे, पुणे,४११०५८.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन  :५ मार्च २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .

ई साहित्यचे वाचक, लेखक  व कोअरटीम यांस

सागरचा सप्रेम नमस्कार



सर्व प्रथम आपल्या उपक्रमाला मनापासून शुभेच्छा. तसेच मराठी दिनाच्या देखील खुप खुप शुभेच्छा. आपण सुरु केलेला हा उपक्रम मला मनापासून खुप आवडला.

आपल्या मराठी साहित्यिकांना योग्य व्यासपीठ म्हणुन मी आपल्या संकेतस्थळाकडे पाहतो.

मला लहानपणापासून वाचनाची खुप आवड आहे.

काही वर्षापासून लिहायाची ही गोडी त्यातूनच निर्माण झाली.

काही कल्पनेतून काही अनुभवातून लिहितोय.

ते वाचकांपर्यन्त पोहोचावं एवढीच ईच्छा.

म्हणून आपणास संपर्क.

माझ्याबद्दल सांगायच म्हणजे मी pragmasys consulting या IT कंपनीत संगणक अभियंता आहे. लेखनाची आणि वाचनाची विशेष आवड असल्यामुळे मी मराठी साहित्याशी चांगला परिचित आहे.

माझ्या लेखनाबद्दल सांगायचे तर आजवर मी कामशेत आणि अघटित या दोन कथा लिहिल्या आहेत.

आपणास पाठवलेली कामशेत एक भयकथा आहे.

आणि अघटित ही एक थ्रिलर कथा आहे.

कथालेखनासोबत मला काव्यरचनेचा देखील छंद आहे.

प्रेम, निसर्ग, स्वभाव आणि समाज या विषयावर अनेक कविता लिहिल्या आहेत.

आता प्रेमकथा लिहण्याची ईच्छा आहे.

आपल्या वाचकांना व ज्येष्ठ लेखकांना माझी ही विनंती आहे की त्यांनी हे पुस्तक वाचल्यावर मला ते कसे वाटले ते कळवावे. अगदी टीकाही चालेल. मला माझ्या अज्ञात वाचकांशी बोलायचे आहे.

धन्यवाद

आपला शुभेच्छुक

सागर पाटील

फ्लैट-४,
दत्तराज अपार्टमेंट,
इंगळेनगर,आंबेडकर चौक
वारजे, पुणे,४११०५८,
Mob. 9158529817
patilsagarashok@gmail.com
facebook.com/sagrajput

या कथेतील सर्व स्थळे, पात्रे, व प्रसंग पूर्णतः काल्पनिक आहेत.

# कामशेत...

एक कालरात्र

आज सकाळपासून मनात बालपणीच्या गोड गोष्टी आठवतायत.

सर्व गोष्टी कशा बदलून जातात ना?

काल परवाच सर्वांसोबत रात्री रामाच्या शेतात जाऊन इंद्रजालचे प्रयोग केले.

आणि आज सारं बदललेलं .

वेळ कशी गती घेते ना काही कळत नाही.

शांततेत सुरू आहे वाटतं सारं अन कधी वेळ वेगळया वळणावर आणून सोडते.

काही कळत नाही.

कधी कुतूहल म्हणून आम्ही काय काय करायचो.

सर्व गोष्टी रात्रीच्या चर्चेत ताज्या झाल्या होत्या.

मात्र आता या चर्चासुद्धा दुर्मिळच. कधितरी दोन पाच महिन्यात सर्व गावाकडे जमणार तेव्हा झाली तर झाली एखाद बैठक. मात्र हवंस वाटतं सारं.

पुन्हा जावं त्या आयुष्यात आणि भरभरून जगून घ्याव.

कारण पुन्हा परत या आयुष्यात आल्यावर पश्चाताप नको.

मनाच्या कल्पना साऱ्या.

असाच एकटा विचार करत बसलो होतो .

काही नवीन नव्हतं.

असे विचार नेहमीचेच.

ट्रिंग ट्रिंग..

फोनचा आवाज़ ऐकून भानावर आलो.

वैभव चा कॉल होतो .

"वैभव देशमुख" मला अभियांत्रिकीला प्रवेश घेतांना भेटलेला पहिला मित्र.

जळगावचे असल्यामुळे आम्ही नेहमी लोणावळा सोबत येत जात असायचो.

म्हणून का असेना मात्र एक चांगला मित्र.

"हो बोल ना वैभ्या काय म्हणतोस" म्हणत मी त्याच्याशी बोलायला सुरुवात केली.

"अरे आज जायचंय आपल्याला लोणावळा"

काय चालले आहे वगैरे विचारायचे  सोडून वैभ्या परत जायचं या आज्ञेपासूनच सुरु झाला.

"आजच ..?" .
मला विचित्रच वाटलं कारण परवाच आम्ही परीक्षा संपवून सोबत गावी आलो होतो.

"आता निवांत महिनाभर घरीच राहणार..!!" वैभ्या येतांना मोठ्या तावात बोललेला.

आणि अचानक जायचं..?

मला आधी थोडं विचित्र वाटलं म्हणून चकित होऊन मी वैभ्याला विचारलं.

"का रे बाबा, काय आभाळ कोसळलंय?"

"अरे कॉल आला होता कॉलेज चा..! सेमीनार आहे म्हणे कसलं तरी" वैभ्याने जायचंय ठरवलंय एव्हाना मला कळालं होतं.

मी थोड्या वेळात कॉल करतो म्हणून फोन ठेवला.

सुरुवातीला वाटलं जाऊच नये.

पण का कुणास ठाऊक जायची इच्छा झाली.

परत वैभवला कॉल केला

"ठीक आहे जाऊ" म्हणून मीही तयार झालो.

आईला सांगितलं.

आईने थोडी आधी विचारपुस केली.

"आई महत्वाचं आहे उद्या जाणं
कॉलेजला इंटरनॅशनल सेमीनार आहे."
म्हणून मी आईला समजावल.

काही महत्वाचं काम असेल म्हणून तीही तयार झाली.

तसं जाणं एवढं फारसं महत्वाचं नव्हतं पण तरी मी तयार झालो होतो.

माझंही घरी फारसं मन रमलेलं नव्हतं.

अन बॅग्स वगैरे भरून तासाभरात जायला सज्ज झालो .

मला कळत नव्हतं मी अचानक कसा तयार झालो होतो.

कारण घरी येऊन फक्त दोन दिवस झाले होते.

आणि जातांना पप्पाना न भेटताच मी पहिल्यांदा निघालो होतो.

कदाचित सर्व काही पूर्व निश्चित असतं असा काहिसा काल्पनिक विचार त्या दिवशी मनात सतत घरंगळत होता.

आपण कधीतरी वेळ ठरवतो.

आणि वेळ आपल्याला अशा ठिकाणी पोहोचवते
ज्याचा आपण विचार देखील केलेला नसतो.

आणि सुरुवात झाली त्या अविस्मरणीय रात्रीची.

पुढे स्टेशनवर वैभव भेटला.

ट्रेनची वाट बघत आम्ही गप्पा मारण्यात काहीशे गुंतलो होतो .

मात्र त्यादिवशी घड्याळाची गती मंदावलेली भासत होती.

वेळ जातच नव्हता.

वास्तविक याआधी वैभव सोबत असताना मला वेळ कसा जायचा कळत नव्हतं .

पण त्या दिवशी वेगळाच अनुभव येत होता. कदाचित अचानक घरून निघावं लागलं म्हणून तसं होतं असावं असं समजून मी पुन्हा गप्पा मारण्याचा प्रयत्न करत होतो.

मग काही वेळाने आमची ट्रेन आली आणि आम्ही ट्रेन मध्ये चढलो.

reservation नसल्यामुळे आम्हाला बसायला जागा मिळाली नव्हती.

दाराच्या कडेला उभं राहूनच आपला प्रवास आहे म्हणून आम्ही शांत उभे होतो .

मग काही काळ विविधतेने नटलेला आपला देश अर्थात सोबतीच्या अनोळखी प्रवाशांकडे बघत काही काळ आम्ही स्तब्ध उभे होतो.

काही वेळाने लक्षात आलं

एक इसम धुन्दीत दारात बसून आम्हाला त्याच्या जवळ बोलावत होता.

आता उभं राहून कंटाळा आला होता.

बैग्स व्यवस्थित ठेवून आम्ही त्याच्याजवळ जाऊन बसलो.

तो नशेत होता. पण का कुणास ठाऊक आम्ही त्याच्याशी गप्पा मारायला सुरूवात केली.

त्याच्या गोष्टी सर्व नशेत सुरु होत्या पण आम्हाला करमणूक झाली होती.

दोन पाच स्टेशन गाडी रात्री थांबणार नव्हती म्हणून दरवाजा बंद करून आम्ही निवांत बसलो होतो.

गप्पा मारत

आमची झोप मात्र अपूर्णच होती.

काही वेळाने आम्हा दोघांना झोप लागली.

अन लोणावळा स्टेशन कधी येऊन गेलं कळालंच नाही.

थोड्या वेळाने जाग आल्यावर कळालं तेव्हा ट्रेन स्लो झाली होती.

आता येथे उतरून परत लोकलने लोणावळयाला जाऊ ठरवलं.

बॅग्स घेऊन कसेतरी खाली उतरलो .

उतरताना वैभ्या थोडा गडबडला त्याच्या पायाला थोड़ लागल.

सावरून आम्ही इकडे तिकडे नजर फिरवली.

सर्वदूर अंधार अन निर्जन परिसर.

उगाच उतरलो वाटत होतं.

पण आम्ही परतही जाऊ शकत नव्हतो कारण ट्रेन आता गेली होती.

मन मारून पुढची व्यवस्था बघायची होती.

काही वेळ थांबुन आम्ही खाली उतरून प्लेटफॉर्म क्रॉस करायला निघालो.

मी पुढे चालत होतो.

वैभ्या माझ्या मागे होता.

अन अचानक एक ट्रेन भरधाव वेगाने पुढच्या प्लेटफॉर्मवर आली.

मी त्या प्लेटफॉर्मवर पाय टाकनार तोवर वैभ्याने मागून आवाज दिला.

मी सावध होऊन मागे आलो.

कदाचित अजून दोन सेकंद उशीर झाला असता तर मी यमसदनी पोहोचलो असतो.

ट्रेनचा तो दीर्घ कर्कश आवाज माझ्या कानात अजूनही घोंगत होता.

मी पूर्णपणे अस्वस्थ झालो होतो.

मृत्यु अगदी जवळून परत गेल्यागत वाटत होतं.

का कुणास ठाऊक मात्र आम्ही ज्या गाडीतून उतरलो तिच्या आवाजामुळे त्या ट्रेनचा आवाज आला नसावा समजून मी थोडा स्वस्थ झालो.

कदाचित जर तेथे वैभ्या नसता तर ती माझी शेवटची रात्र होती.

बिथरलेल्या पावलांनी आम्ही चालायला लागलो.

काजव्यांच्या प्रकाशात दिसावं असं काहीस "कामशेत" नाव मी स्टेशनवरच्या पाटीवर वाचलं.

स्टेशनवर कोणीच नव्हतं.

एक बाहेर जाणारी वाट तेवढी दिसत होती.

मात्र ती वाट जातेय कुठे काही कळत नव्हतं.

अगदी शांतता

कोणी येण्याची हिंमत करणार नाही असला काळोख

अन कानांना चिरणारा रातकीडयांची किर्र.. किर्र.. आवाज़ आमच्याशिवाय कोणी नसल्याची खात्री देत होता.

पण कुणीतरी असण्याच्या आम्ही शोधात होतो.

कारण त्या वेळी लोणावळा जाणं शक्य नाही याची एव्हाना आम्हाला खात्री पटली होती.

म्हणून रात्र तेथेच काढावी लागणार होती.

काही मदत मिळेल या उद्देशाने आम्ही स्टेशनवर फिरत होतो.

सुरुवातीला काही एडवेंचर करतोय असा फिल येत होता.

पण जशी वेळ वाढत होती तशी आमची भीती वाढायला लागली.

आणि आमची नजर एका बाकडयावर पडली.

त्यावर एक वृद्ध फाटकी चादर ओढुन झोपलेला होता.

त्याच्याकडे बघून तो वयस्कर आणि गरीब वाटत होता. मळलेले कपडे दाढी वाढलेली अन सुरुकुत्यानी भरलेला चेहरा. त्याच्या एकटेपणाची जाणीव करून देत होता.

काहीतरी मदत मागावी म्हणून त्याला उठवायला गेलो.

आणि तेव्हा घडलेल्या गोष्टीने माझ डोक सुन्न झालं.

म्हातारा अचानक उठून बसला अन बोलायला लागला.

"आलायसा.. वाट बघत व्हतो.. उशी---र झाला ".

त्याच्या बोलण्यावरून वाटत होतं जणु तो आम्हाला receive करायलाच आलेला होता.

त्याच्या नजरेत एक विलक्षण आग दिसत होती.

आम्ही वेडा समजून तिथून निघायला लागलो. "जावा तुमचा नंबर हाय वाटतं आज" म्हातारा चादर सावरत बोलला.

"वापिस जावा लै घान मौत मरशान " तो पुन्हा बोलला.

त्या विलक्षण कृतींनी आमचं डोकं सुन्न केलं होतं.

आम्ही तेथून निघालो

स्टेशनवर ना लाईट्स ना कसली अनोंसमेंट .. फक्त शांतता.

मध्येच कसला तरी विचित्र आवाज येई.

भितीनं कापरं सुटेल असला आवाज.

जणु कोणी आर्त वेदनेने किंचाळतंय असं वाटत होतं.

आता मात्र आमची अवस्था गंभीर झाली होती

प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला होता.

हळूच येणारी वाऱ्याची झूळूक देखील आम्हाला तुफानाचा संकेत देऊन जात होती.

सर्व दूर किर्र.. किर्र.. आवाजात जणु उरलेली सारी दुनिया शांत वाटत होती.

एकमेकांच्या आधारावर आपण टिकलोय वारंवार वाटत होतं.

मी सहज घड्याळाकडे बघितलं 12.50 झाले होते.

आता वाट बघायची होती आम्हाला सकाळच्या पहिल्या ट्रेनची. कारण आता रात्रीत कसल्या गाडीचे येण्याचे चिन्ह दिसत नव्हते.

स्टेशनवरील बाकी वातावरण तिथल्या गोष्टिंना पाठपुरावा देत होतं.

गर्द झाड़ी आजुबाजुला एकही वस्ती नसल्याची खात्री देत होती.

त्यामुळे तेथून गावात जाण्याचा विचार देखील आम्हाला आला नव्हता.

मी सहज त्या पूर्वीच्या म्हाताऱ्यावर नजर टाकली.

मात्र तो तिथे नव्हताच.

मी सर्वदूर नजर फिरवली मात्र तो कुठेच दिसत नव्हता.

कशाला भीति वाढवून घ्यावी या भावनेने मी त्याकडे दुर्लक्ष केल.

आणि थोडया वेळाने एक ट्रेन आली.

आम्ही बैग्स सावरून उभे होतो.

मात्र ती ट्रेन  न थांबताच निघून गेली.

प्रत्येक गोष्ट जणु आमची जाणून बुजून केलेली चेष्टा होती.

आणि अचानक आम्ही बसलेल्या जागेवरील प्रकाश गायब झाला.

मी एकदम दचकलो.

आणि सावरून उठून उभा राहिलो.

कदाचित दुसरीकडे आपल्याला बसता येईल म्हणून मी दुसऱ्या प्रकाशाच्या शोधात लागलो.

एव्हाना वैभव झोपी गेला होता.

त्याच्या झोपेत कशाला बाधा बनावं म्हणून मी एकटाच तेथून उठलो आणि चालायला लागलो.

कुणीतरी किंचाळण्याच्या आवाजाने मला थांबवलं.

परंतु ज्या दिशेने आवाज आला होता त्या दिशेला कोणीच नव्हतं.

मी पुन्हा चालायला लागलो .

आता पावलं जड़ झाली होती.

परंतु मागे सोडलेल्या जागेपेक्षा पुढची जागा जास्त सुरक्षित वाटत होती.

एव्हाना मी वैभव पासून तीस चाळीस पावलं दूर आलो होतो.

मला वाटलं अजून दूर जाऊन काही मिळणार नाही म्हणून परत यायला निघालो.

पण तेव्हा मी जे बघितल त्याने माझी सर्व हिंमत संपली.

वैभव उठून बसला होता.

आणि एकटक बघत जोरजोरात हसत होता.

मला त्याच्या अवताराकडे बघून जवळ जायची हिंमत होतं नव्हती.

पण कदाचित तो मला घाबरवत असावा म्हणून मी त्याच्या जवळ गेलो.

मात्र त्याचे डोळे लालबुन्द झाले होते.

चेहऱ्यावरचा भाव कसल्यातरी प्रतिशोधाची भावना स्पष्ट करत होता.

एकमेकांचा आधार आता चूर चूर झाला होता.

मला काय करावं काही सुचत नव्हतं.

माझा प्रत्येक निर्णय चुकीचा ठरत होता.

अचानक वैभव उठून धावायला लागला .

त्याला सावरणं कठीण होतं.

म्हणून मीही त्याच्या मागोमाग चालू लागलो.

पळता पळता अचानक तो एका वडाच्या झाडाखाली थांबला.

मीही त्याच्या पाठी थाम्बलो.

"आणलं नव्हं .. रातच्याला लई हिंमत होती नव्हं .. वाचिव आता येला" वैभ्या बोलत होता.

सर्वदूर शांतता.. फ़क्त रात्रकिड्यांचा कीर्र कीर्र..

आणि वैभ्याचा घोगरा विचित्र आवाज

त्या शांततेत जणु त्याला एकटयालाच बोलायचा अधिकार होता.

माझी तर वाचाच बंद झाली होती.

गोठणाऱ्या ठंडीत घामाने मी पूर्ण भिजलो होतो.

पाय थरथर कापत होते.

लहानपणी सांगितलेल्या सर्व गोष्टी आठवत होत्या.

भितीने कान सुन्न झाले होते.

क्षणार्धात आजवर ऐकलेल्या भयकथा आठवल्या होत्या.

म्हाताऱ्याच्या स्कीनसारखं ते जुनाट वडाचं झाड

वैभ्या वडाच्या झाडाच्या बुंध्याला उलटा लटकुन वेगळयाच आवाजात बडबडत होता.

अजिबात न उमगणारी भाषा…

माझा डोळयांवर कानावर विश्वासच बसत नव्हता.

पूर्वी ऐकलेल्या सर्व गोष्टी मी आठवत होतो.

लहानपणी एका पुस्तकात वाचलेला मंत्र आठवला.

"ओम श्री कव्वं भु भुतेश्वराय मम वश्य कुरु कुरु स्वाहा" मंत्राचा जाप सुरु केला.

तसा वैभ्या खाली आला.

आणि त्याने माझ्या गालावर एक जोराची चपराक ओढून दिली.

तसा मी जागेवर पडलो.

"तुला मंतर भी येता व्है रे भैताड्या. आता म्या दावति तुला" म्हणत वैभ्या स्वतःच्या अंगावर स्वतःच्याच अणुकुचीदार नखांनी जखमा करायला लागला.

भळभळा रक्त वाहू लागलं.

आणि माझ तोंड़ आपोआप गप्प झालं.

मी हाताची बाही सावरत हिंमत करून त्याच्या नजरेत नजर मिळवण्याचा प्रयत्न करत होतो.

माझ्या लक्षात आलं तो एकटक माझ्या हातावरील रुद्राक्षाकड़े पाहत होता.

आणि न बोलताच तेथून चालू लागला.

मला कळालं होतं जोपर्यंत हा रुद्राक्ष माझ्या हातावर आहे तोपर्यंत तो आपल्याला काही ईजा पोहोचवू शकत नाही.

तसा तो रुद्राक्ष वर ठेऊन मीही त्यापाठी चालत होतो.

मघाशी ज्या झाडीला घाबरून वैभ्या गावात जायला नाही म्हटला होता.

तो आता त्याच झाडीतून बिनधास्तपने चालत होता.

माझ्या अंगावरचा काटा मात्र जातच नव्हता.

पण त्याला सोडून जाणं शक्य नव्हतं.

म्हणून मी माझ मन घट्ट करून त्याच्यामागे चालत होतो.

त्याच प्रत्येक पाऊल असं पडत होतं जणु रोज त्याचं तिथे येणं जाणं असावं.

आता गाव दिसायला लागलं होतं.

तसा मी सुखावलो होतो.

काहीतरी मदत नक्की होईल कसलीतरी असा मला विश्वास वाटु लागला होता.

पण अचानक त्याने त्याचा मार्ग बदलवला.

तो मार्ग नक्कीच गावाबाहेर नेत असावा याची मला एव्हाना कल्पना झाली होती.

पण काहीतरी वेगळ पाऊल उचलणं अनिवार्य होतं.

त्याशिवाय होणाऱ्या प्रकाराविषयी माहिती मिळणं शक्य नव्हतं.

म्हणून मी सर्वदूर नजर फिरवत होतो.

आता देवच काहीतरी मार्ग दाखवणार म्हणून समोर दिसणाऱ्या देवळावर जायचं ठरवलं.

तिथे गावातील इतर वातावरणापेक्षा काही वेगळं वातावरण होतं.

जणु सर्वदूर पसरलेल्या त्या घातकी शांततेत आणि मंदिरावरील शांततेत धरती आकाशाचा फरक वाटत होता.

मघाशी स्टेशन वर बघितलेल्या म्हाताऱ्याकडे बघून माझी हिंमत पुन्हा वाढली.

म्हाताऱ्याला झाला प्रकार सांगितला.

म्हातारा आता काळजीच्या नजरेने माझ्याकडे बघत होता.

"सांगलं होतं नव्हं.. जावा म्हणून... आता नाही सोडणार ती ..लै बाराची हाय ती कशाले नादि लागले".

मी विचारल "अहो आजोबा पण हा प्रकार काय आहे".

"चल अदुगर त्या बिचाऱ्याले वाचवु" म्हणत तो चालू लागला.

मी विचारल "आजोबा मघाशि तुम्ही स्टेशनवर झोपले होते. आता मंदिरावर कसे".

"ध्यानात नव्हतं आमोशा हाय आज" म्हणत म्हातारा वैभव ज्या दिशेला गेला होता तिकडे भराभर पावल टाकत चालू लागला.

तसा मी त्याच्या मागे चालत होतो.

गावाबाहेर एक वाडा होता.

अगदी जुना कदाचित कोणी राहत नसावं तिथे.

मी चालण्याचा वेग कमी केला.

म्हाताऱ्याची पावलं देखील आता मंदावली होती.

वारा शांतपणे झाल्या प्रकाराची गुपितता लपवत होता.

निर्जनवस्ती अंधाराच्या साम्राज्याची शाश्वती देत होती.

वर्षांपासून जणु त्या जागेने सूर्य पाहिला नव्हता.

तो एकांत शांत वाडा या अंधाराच्या साम्राज्याचा जणु राजमहल होता.

बाहेरच्या अंधारानेच आमची अवस्था अशी होती की वाडयात जाणं शक्य नव्हतं.

पण वैभ्या एकटा आत होता.

म्हणून आत जाणं भाग होतं.

आम्ही भीती पचवत आत जायचं ठरवलं.

दार उघडल कर्र..कर्र.. आवाज त्याच्या जीर्णतेचि जाणीव करून देत होता.

हिंमत करून आम्ही दोघं आत शिरलो.

आत आल्यावर तिथल्या भुतकाळाची काहीतरी वेगळीच शाश्वती येत होती.

तिथल्या भिंतिंनी काहितरी खुप अन्याय सहन केलाय असं काहीसं वाटत होतं.

प्रत्येक गोष्टीची गोठलेली जाणीव भुतकाळात झालेल्या गोष्टींची उजळणी करत होती.

माझी नजर या सर्व अनुभवाना टिपत होती.

आणि अचानक वैभ्याचा आवाज आला "साग्या कुठे आहेस वाचव रे मला".

तसा दचकुन मी त्या दिशेने धावलो.

वैभ्या जिन्यावर बसून खुनशी नजरेन आमच्याकडे बघत होता "आलास ठाउक होतं .. दोस्त हाएस नव्ह..  जीव प्यारा नही तुला".

"कोनालेच सोडणार नही

म्हाताऱ्या तुले त आज जिताच सोडणार नही

ठेष्णावर नही घावलास" म्हणत तो भिंतीजवळ गेला आणि भीन्तिवर काहीतरी कोरायला लागला.

त्याच्या हातांचं रक्त भिंतिंवर उमटत होतं.

मी वाचण्याचा प्रयत्न करत होतो.

पण काही स्पष्ट दिसत नव्हतं.

हातातल्या मोबाईलच्या टॉर्चने मी बघण्याचा प्रयत्न केला.

पण कुठली भाषा काही कळत नव्हतं.

मी म्हाताऱ्याला विचारल "आजोबा तुम्हाला काही कळतय का..? काय प्रकार आहे हा..?".

म्हातारा म्हटला "सगळ सांगतो पहिले आपल्याले ती आपल्याजोय येणार नही असं काही कराव लागल".

मग आम्ही म्हाताऱ्याच्या पिशवितला मसाला आजुबाजुला ओतून आत बसलो.

मसाल्याच्या उग्र वासाने भुतप्रेत जवळ येत नाही मी कुठेतरी वाचल होतं.

आणि मग म्हाताऱ्याने कहानी सांगायला सुरुवात केली.

इंग्रजांच्या काळातली ही घटना आहे.

आज होणारा सारा प्रकार त्या भुतकाळाने पाहीलेल्या आणि सहन केलेल्या घटनांचा परिणाम आहे.

हा परिसर त्या काळी पावसाळयात अगदी स्वर्गावानी बहरून जाई.

निसर्गाच्या सौंदर्याने सर्वांचे मन आकर्षित होई.

डोंगरदऱ्यावर हिरवेगार दृश्य
सगळीकडे पसरलेलं पुसट धुकं
वेगवेगळया पक्षांचे मधुर आवाज
मनाला जस सर्व सर्व जाचातून मुक्त करून टाकत होतं.

सर्वदूर शीतल छाया

भाताच्या शेतीतला चिखल या सर्व गोष्टीत आणखी भर घालत होता.

कामशेत त्याकाळी या परिसरात वसलेलं छोटंसं गाव.

गावाच्या थोड्या बाहेर असलेल्या मोकळया वातावरणात हा वाडा विशेष होता.

त्याकाळी हा वाडा गावच्या पाटलांचा असायचा.

वाडयाची आताची सुबकता स्पष्ट करत होती की नक्कीच  वाडा कोणाचा तरी विशेष व्यक्तीचा असेल .

रघुनाथ पाटिल त्याकाळी कामशेतचे पाटील होते.

आणि ते याच वाडयात आपल्या परीवारासोबत वास्तव्यास होते.

रघुनाथरावांच व्यक्तिमत्व अगदी रुबाबदार आणि त्यांच्या अधिकाराला शोभुन दिसावं असं होतं.

उंच बांधा पांढरे शुभ्र वस्त्र आणि हातात राजेशाही उपरणे. सर्वजण त्यांच्या या रुपाशी परिचित होते.

गावात रघुनाथरावांचा खुप आदर केला जाई.

गावातील कुठलेच तंटे रघुराथरावांशिवाय सुटत नसे.

सर्व गाव त्यांच्याशी अदबीने वागी.

गावातील हा आदर गावापर्यंतच मर्यादित नव्हता.

पंचक्रोशित त्यांच्या रुबाबाची अन आदराची चर्चा होती.

रघुनाथरावांना दोन मुली, उत्तरा आणि निशा, अन एक मुलगा, माधव, अशी तीन संताने होती.

पत्नी आणि मुले यांच्यासोबत त्यांचा संसार अगदी व्यवस्थित चालला होता.

रघुनाथरावांच्या दोन्ही मुली सुंदर आणि सुसंस्कृत होत्या.

रघुनाथरावांचे संस्कार त्यांच्या प्रत्येक कृतित आणिचेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

प्रत्येक व्यक्ती रघुनाथरावांजवळ त्यांच्या मुलींचे गुण गात असे.

रघुनाथरावांना अगदी भरून आल्यासारखं होई.

माधव मात्र या सगळया गोष्टिंपासून वेगळा होता.

तो आपल्याच विश्वात गुन्तुन राही.

रघुनाथराव सतत त्याला समजवण्याचा प्रयत्न करत असत.

पण त्याला काहीच फरक पडत नव्हता.

मनात येईल तसं वागणं.

कोणाशी धड बोलणं नाही.

रघुनाथराव सतत त्याच्या चिंतेत असत.

उत्तरा आणि निशा मात्र आपलं शिक्षण पूर्ण करून घरीच राहत होत्या.

सर्व काही सुरळीत चाललं होतं.

कदाचित तुफ़ानापुर्वीची शांतता.

लॉर्ड कर्ल त्याकाळी पुण्याचे अधिकारी होते.

आणि कामशेतला पाहणीसाठी आलेले असतांना त्यांना इथलं वातावरण खुप भावलं होतं.

म्हणून त्यांनी तिथेच काही दिवस राहायचं ठरवलं होतं.

गावात राहूनच आपलं काम तो बघत होता.

तिथल्या लोकांचा आदर अन वातावरण त्याला तेथून निघू देत नव्हता.

असंच काही कामानिमीत्त लॉर्ड एक दिवस रघुनाथरावांना भेटायला आला.

लॉर्ड कर्ल अगदी तरुण अधिकारी होता.

रुबाबदार व्यक्तिमत्व आणि त्याचं बोलणं समोरच्याला आपलंसं करणारं होतं.

रघुनाथरावांनी त्यांच्यात संभाषणासाठी उत्तराला बसवल होतं.

कारण उत्तरा शिक्षित होती.

**सोळावं वर्षं, चंचल मन...**

त्या अबोध वयातील उत्तरा त्याला काही अपवाद नव्हती.

त्याच्या नजरेने पहिल्या भेटीतच उत्तरा त्याच्या प्रेमात पडली होती.

त्यालाही ती आवडली होती.

दोघंही नंतर खुप जवळ आले होते.

रोज भेटी सुरु झाल्या होत्या.

ही गोष्ट मात्र समाजाला पटण्याजोगी नाही हे जाणून देखील प्रेम कमी झाले नव्हते.

दोघांचा जीव एकमेकात अडकला होता.

एकमेकांना भेटल्याशिवाय राहावेच ना.

हळूहळू ही बातमी गावभर पसरली.

गावातल्या लोकांना बोलायला नवीन विषय मिळाला.

रघुनाथरावांच्या सामंजस्यामुळे त्यांचा गावात जेवढा आदर होता.

तेवढाच द्वेष वाईट लोकांच्या मनात होता.

आता तर त्यांना कारण मिळाल होतं.

लॉर्ड कर्ल मात्र या सर्व गोष्टिंच्या परिणामांपासून दूर होता.

कारण तो एक इंग्रज अधिकारी होता.

आणि म्हणून त्याला कोणी काही करु शकत नव्हते.

उत्तराची अवस्था मात्र खुप वाईट झाली होती. तिला काय करावे कळतच नव्हते.

वडिलांचा आदर आपल्यामुळे धुळीत मिळाल्याची भावना तिला जगू देत नव्हती.

पण प्रेमात ती या गोष्टींचा विचार येऊ देत नव्हती.

आणि तिने ठरवलं लॉर्ड सोबत पळून जायचं.

रात्रीच्या वेळी ती लॉर्ड कडे जायला निघाली. मात्र लॉर्ड कधीच तिला सोडून निघून गेला होता.

कोणीतरी पाहील या भीतिने ती परतीला लागली.

मात्र रंगा आणि भीमा दोघं डाव साधुन होते.

एकदा एका मुलीच्या छेड काढण्यावरून रघुनाथरावांनी त्यांना सहा महीने गावाबाहेर राहण्याची सजा सुनावली होती.

रघुनाथरावांचा बदला घ्यायचा म्हणून त्यांनी हा कट रचला होता.

लॉर्डने सर्व प्रकाराला कंटाळून आधीच पळ काढला होता.

ती नक्कीच त्या दिवशी पळणार त्यांना खात्री होती.

ठरल्याप्रमाणं झालं

रंगा आणि भीमा दोघांनी तिला पकडून स्टेशनवर आणलं.

रात्रीच्या वेळी स्टेशनवर कोणी नव्हतं.

त्या नराधमांना या गोष्टीचा फायदा मिळाला.

तिच्यावर अत्याचार सुरु झाले.
मारहाण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला.

तिच्यावर होत असलेले अत्याचार बघायला तिथे कोणीच नव्हते.

अमानुषपणे तिच्या शरीराला पीड़ा देण्यात येत होत्या.

तिची एक एक किंचाळी ह्रदय चीरनारी होती.

एवढ्या पीड़ा देऊन त्या नराधमांचं मन भरल नव्हतं.

त्यांनी तीने प्राण त्यागेपर्यंत अत्याचार सुरु ठेवले होते.

आणि उत्तराने प्राण त्यागले.

त्यांनी तिच्या देहाचं नंतर काय केल काही कळाल नाही.

मात्र दुसऱ्या दिवशी सर्व गावात बोम्बाबोम्ब झाली की लॉर्ड आणि उत्तरा पळून गेले.

रघुनाथरावांचि शारीरिक आणि मानसिक स्थिति या धक्क्याला पचवू शकले नाही आणि त्यांनी काही दिवसांच्या आजारपणात आपले प्राण सोडले.

संपुर्ण घराला जणु शाप लागला होता.

माधव वेडा झाला होता.

सतत वाडयात विचित्र आवाज येत होते.

नोकर चाकर काम सोडून निघून गेले होते.

म्हणून तिची आई आणि बहिण देखील ते सारं सोडून दुसऱ्या गावी गेले.

वाड़याच्या या सर्व गोष्टी ऐकून येथे कुणाचं येणं जाणं देखील बंद झालं.

रघुनाथरावांचा आत्मा भटकत असावा अशी साऱ्यांची समजूत झाली होती.

मात्र त्यानंतर स्टेशनवर अशा घटना घडल्या की सर्व झालेला प्रकार लोकांच्या काहिसा लक्षात येऊ लागला.

अचानक एका व्यक्तीला रात्री उत्तरा दिसली होती.

आणि काही दिवस आजारी पडून तो मेला होता.

आणि तेव्हापासून रात्री स्टेशन आणि वाडा दोन्ही ठिकाणी लोकांनी फिरकणं बंद केलं.

रंगा आणि भीमाचे हाल खुप वाईट झाले होते. दोघांना अधुविकाराने ग्रासले होते.

सतत इकडेतिकडे बघत त्यांना उत्तराची आकृती दिसत होती.

असं सांगतात काही दिवसांनी दोघांनी एका पाठोपाठ एक रात्री ट्रेन खाली जीव दिला.

पण मरण्यापुर्वी भेदरलेल्या अवस्थेत त्यांनी सर्व काही कबूल करून लोकांकडे मदतीची याचना केली.

तेव्हा गावाच्या लोकांना झाला प्रकार पूर्णपणे लक्षात आला.

त्या नंतर जो कोणी त्या वाडयावर किंवा स्टेशनवर रात्री गेला.

कोणीच वाचला नाही.

म्हातारा बोलता बोलता थांबला होता.

आता माझ्या मनात प्रश्न यायला लागले.

"आजोबा रंगा आणि भीमा दोघांना शिक्षा भेटूनही उत्तरा मुक्त कशी झाली नाही".

"कदाचित संपूर्ण मानव जाती विषयी तिच्या मनात द्वेष असावा" म्हातारा म्हटला.

बोलता बोलता आजोबांनी सांगीतलेली गोष्ट मला आठवली

"आजोबा तुम्ही मघाशी सांगीतल की रंगा आणि भीमा यांनी तिच्या मृतदेहाचं नंतर काय केलं ठाऊक नाही म्हणून " .

मला पूर्वी ऐकलेल्या गोष्टींमधली एक गोष्ट आठवली की जोपर्यंत एखाद्या मृतदेहाचा अंत्यसंस्कार होतं नाही तोपर्यंत त्याला मुक्ति मिळत नाही.

आणि मला क्लू मिळाला होता.

मी आजोबांना सांगितलं .

आणि आता शोध होता आम्हाला त्या मृतदेहाचा.

कदाचित तो मृतदेह आतापर्यंत राहिला नसावा पण त्याचं लोकेशन मिळणं आवश्यक होतं.

वैभ्याची स्थिती गंभीर झाली होती. आम्हाला मृतदेह शोधण्यासाठी कुणाची तरी मदत हवी होती.

मी आजोबांना विचारलं की ज्या व्यक्तिने उत्तराला बघितल होतं ती जागा कुठे होती.

मला वाटलं उत्तराचा मृतदेह तिथेच असावा.

आता बाहेर पडायची वेळ होती.

आजोबांनी दोन लोकेशन सांगितले.

दोघांपैकी नक्कीच एका ठिकाणी तिचा मृतदेह होता असं समजून आम्ही तेथून निघालो.

पहिल लोकेशन स्टेशनच्या मार्गावरच होतं त्यामुळे अगोदर तिकडे जाण्याचं ठरवलं.

आणि निघालो आम्हाला ती नक्कीच अडवण्याचा प्रयत्न करेल आम्हाला ठाउक होते.

वैभ्या आता वाडयाच्या पायऱ्यांवर बसला होता. अचानक तो रड़ायला लागला.

"मी नही पळाली व्हति बाबा .. मले माफ़ करा"

आणि अचानक उठून ओरडायला लागला "नही सोडणार कोनालेच नही सोडणार"

आणि हळु हळु पावलं टाकायला लागला.

त्याचा तो भयावह अवतार पाहून आम्ही थोड़ेशे बिथरलो.

पण हिम्मत करून तिथून निघालो. तोवर अंत्यविधीचं सामान आजोबांनी घेतलं होता. आणि आम्ही चालू लागलो.

आजोबांची विलक्षण हिंमत मलाही हिंमत देत होती.

भविष्याची चिंता आता पार राहिली नव्हती.

एकच लक्ष्य शोध आणि सुरु झाली आमची परीक्षा.

उत्तराचे वेगवेगळे आवाज़ आम्हाला आमच्या सहनशक्तित कमकुवतता आणण्याचा प्रयत्न करु लागले.

वैभवच्या शरीराने आमच्या अंगावर आक्रमण होतं होते.

पण हिंमतीची जणू सवयच झाली होती. ती आपोआप आली होती.

पावलोपावली तिचे प्रयत्न वाढत होते.

तशी आमची खात्री पटली की मृतदेह तिथेच कुठेतरी होता.

आणि अखेर दाट वस्तीत काहिशी मोकळी जागा दिसली.

कित्येक वर्षांपासून कोणाचा वावर नसावा स्पष्ट होतं होतं.

तसा मी त्या दिशेला धावलो.

आणि वैभ्या माझ्यावर तुटुन पडला. "मला जाळतोस व्है" म्हणत तिने मला दूर फेकलं.

आजोबा मात्र तिच्या वस्त्राच्या दिशेने तिच्या प्रेतापर्यंत पोहोचले होते.

तसा मी मंत्र उच्चारायला सुरुवात केली "ओम श्री कव्वं भु भुतेश्वराय मम वश्य कुरु कुरु स्वाहा" तसा वैभ्या चीडत होता.

तिकडे आजोबांनी अंत्यसंस्काराचे मंत्र सुरु केले होते.

आता मात्र तिची कोंडी झाली होती.

कुणाला प्रतिकार करावा तिला कळत नव्हतं.

आजोबांनी तिच्या वस्त्राना आग लावली. तशी तिची तडफड वाढली.

"म्हाताऱ्या सोड मला जीवित सोडन तुला मला वाचीव मला वाचिव" म्हणत ती सुटत होती.

काही वेळाने सर्व शांत झालं.

वातावरण सुखावलं

तुफानानंतर शीत वारं सुटावं तसा शांत वारा सुटला.

वैभ्याची स्थिती थोड़ी खराब होती.

त्यानेच केलेल्या ओरखड्यांच्या वेदना त्याला आता जाणवू लागल्या होत्या.

त्याला काही न सांगता तिथून घेऊन दूर जाणं मला जास्त महत्वाचं वाटलं.

मग आम्ही त्या पूर्वीच्या मंदिरावर आलो. सर्व काही शांत झालं होतं अगदी काही न घडल्यासारंख.

जनु ते एक वाईट स्वप्न होतं असं मला वाटत होतं.

वैभ्याकडून बोलल्यासुद्धा जात नव्हतं. तो फ़क्त थरथरत होता.

आता बराच वेळ झाला होता.

चार पाच तासातच एवढ सारं घडलं होतं माझा विश्वास बसत नव्हता.

अनुभव खुप काही शिकवून गेला होता.

भुतकाळ भविष्याशी कसा जोड़लेला असतो सारं काही स्पष्ट झालं होतं.

एडवेंचर शब्दाचा खरा अर्थ कळाला होता.

सकाळ झाली आता वैभ्या देखील बऱ्यापैकी चांगला झाला होता.

मात्र रात्री झाल्याप्रकाराबद्दल त्याला काही कल्पना नव्हती.

आणि अजूनही नाही.

कदाचित हे वाचून कळेल त्याला.

आणि आजोबांचे आभार मानुन आम्ही लोकलने लोणावळयाला आलो.

सारं काही पुर्वीसारखं झालं होतं.

जणु काही घडलंच नव्हतं म्हणून मी सारं विसरण्याचा प्रयत्न करत होतो.

समाप्त….

सागर पाटील

फ्लैट-४,
दत्तराज अपार्टमेंट,
इंगळेनगर,आंबेडकर चौक
वारजे, पुणे,४११०५८,
Mob. 9158529817
patilsagarashok@gmail.com
facebook.com/sagrajput

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा. हे सर्व फ्री आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com